//सुविचार "यशप्राप्तीसाठी कोणत्याही खास वेळेसाठी थांबू नका! त्याऐवजी आपला सर्व वेळ खास बनवा!!!" //



# आंबटगोड खिचडी

◆ **साहित्य :** १ वाटी तांदूळ, १ वाटी तुरीची किंवा मुगाची डाळ, १ अख्खं लिंबू, २ हिरव्या मिरच्या, १ चमचाभर जिरं, पाव चमचा हिंग, पाव चमचा हळद, जरासं तेल, चवीनुसार मीठ आणि जरा गोडसर चव येईल तेवढे गूळ किंवा साखर, आधणाचं गरम पाणी ४ वाट्या.

◆ **पाककृती :** डाळ + तांदूळ पाण्यात १०-१५ मिनिटं भिजत घालावेत, नंतर दोन-तीन पाण्यातून धुऊन, पाणी निथळून फोडणीत पडण्याकरता तयार ठेवावेत. कूकर गरम करत ठेवावा आणि जरासं तेल घालून चमचाभर जिऱ्याची फोडणी करावी. ते फुललं की जरासं हिंग घालावं आणि ते फसफसलं की मिरच्यांचे हातानेच मोडून मोठे तुकडे टाकावेत. वर डाळ, तांदूळ आणि हळद घालून मिनिटभर परतावं आणि उकळीचं पाणी घालून नेहमी प्रमाणे खिचडी शिजवून घ्यावी. कूकरचं प्रेशर पडून तो उघडला की खिचडी बुडेल इतकं गरम पाणी परत घालावं आणि गरम करत ठेवावे. यात आता एका संपूर्ण लिंबाचा रस, मीठ आणि साखर घालून चांगले घोटून, ढवळून रटरटू द्यावे. पाच-एक मिनिटांनंतर आच घालवून अगदी गरमच वाढावी. वर साजूक तूप चांगले मोठा चमचाभर घालायला विसरायचं नाही. हवी असेल तर वाढतेवेळी बारीक चिरलेली थोडी कोथिंबीर वर पेरावी. ताज्या कोथिंबिरीचा स्वाद चांगला लागतो आणि खिचडीचा हलका पिवळा अन् कोथिंबिरीचा हिरवागार रंग दिसायलाही छान दिसतो.



# कम्फर्ट व्हर्सेस फॅशन, दोन्ही कसे मिळवाल?

'आरामदायीपणा सर्वात महत्त्वाचा' हे सर्वश्रुत आहे, परंतु जेव्हा स्त्रियांच्या फॅशनचा विषय येतो, तेव्हा एखादी गोष्ट निवडताना केवळ या एकाच गोष्टीचा विचार करून चालत नाही. गेल्या अनेक वर्षांपासून ॲथलेअरचा ट्रेंड वाढत असताना, स्त्रिया दोन्ही गोष्टी मिळवून देण्याची १०० टक्के शक्यता असल्याचे सिद्ध करत फॅशनविरुद्ध कम्फर्ट असे वादविवादाचे अनेक मार्ग शोधत आहेत. जेव्हा त्या आरामदायी हा शब्द ऐकतात तेव्हा, त्यामध्ये लेगिंग्ज आणि घाम नेहमीच प्रथम गोष्टी असतात, परंतु जेव्हा फॅशनचा विषय येतो, तेव्हा, फॅशनचे समर्थक निःसंशयपणे अधिक सर्जनशील होतात.





आपण २१ व्या शतकात वास्तव्य करत आहोत, जेथे स्त्रिया सतत समाजात मिसळत असतात, वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनशैली आहेत आणि ही वेळ आपण आपल्या कपड्यांसह अधिक आरामदायक आणि फॅशनेबल निवड करण्याची. चांगली बातमी अशी आहे की, अलीकडच्या काळात लाऊंजवेअर खूप वर्षांनी आले आहेत. केवळ त्यामध्ये भरपूर पर्याय म्हणून नाहीत तर ते सैल, आरामदायी असे कपडे खरोखरच ट्रेंडमध्ये आहेत. आता आपल्या मैत्रिणींसह दिवसातून जास्तीत जास्त वेळा बाहेर फिरायला जाऊ शकता, तुम्ही आरामदायी वाटू शकेल ते ही विशेष काही न बदलता. जर आपण त्यांना 'जॉगर्स' म्हटले तर, तुम्ही त्यांना धावपट्टीवर स्वेटपॅन्टस म्हणून देखील घालू शकता. आपण ड्रेसिंगच्या सुवर्णयुगात राहत आहोत - एका आळशी मुलाचे फॅशन स्वर्ग.

म्हणून, व्हिस्कोस त्याच्या गुणधर्मांसह उच्च श्वासोच्छ्वास, संपूर्ण जैव-विकृती आणि पर्यावरण अनुकूल अशा श्रेणीतील पसंतीची निवड ठरली आहे. व्हिस्कोसपासून बनवलेल्या कपड्यांचे हे सॉफ्ट टेक्स्चर आहे, ज्यामुळे त्यांना सहजपणे पोशाख करणे सोपे होते आणि आपल्याला पाहिजे असलेल्या शैलीत वापरणे सोपे होते. फॅब्रिकची फ्लुएडीटी शरीरावर ड्रेप करण्यास अधिक मदत करते, त्यामुळे फॅब्रिक अंगावर चमकण्यास मदत होते.

कपड्यांसह लेअरिंग अत्यंत सोपे आहे, कारण याचा पोत कपड्याचा गोळा होऊ देत नाही. हे कोणत्याही फॅशनिस्टांसाठी असणे आवश्यक आहे. उज्ज्वल रंग आणि पेस्टल्स रंग ट्रेन्डमध्ये आहेत, त्यामुळे फॅब्रिकची रंगीत होणारी क्षमता आकर्षक बनवते.

# जेवल्यानंतर कधीच खाऊ नका 'या' गोष्टी, आरोग्यास होईल नुकसान

बदलत्या जीवनशैलीनुसार खाण्या-पिण्याच्या पद्धतीत सुद्धा बदल झाला आहे. तर काही जणांना जेवल्यानंतर लगेच झोप येणे, थोड्या वेळाने पुन्हा भूक लागल्याने खाणे अशा विविध सवयी असतात. मात्र या सवयी तुमच्या आरोग्याला धोका पोहोचवू शकतात. हे खरं आहे, कारण जेवल्यानंतर काही गोष्टी खाऊ नयेत किंवा करू नयेत, असा सल्ला दिला जातो. त्यामुळे तुम्हाला सुद्धा जेवल्यानंतर खाणे किंवा झोपण्याची सवय असल्यास ती आजच बदला. याचा फायदा तुम्हाला नक्की होईल.

सकाळचा नाश्ता पोटभरून करायचा, दुपारचे जेवण मध्यम आणि रात्रीचे जेवण अगदी कमी करावे, असे सांगितले जाते. कारण दिवसभरातील आपण ज्या गोष्टी खातो त्या पचण्यास काही काळ लागत असून ते नीट न पचल्यास विविध समस्या उद्भवतात. मात्र जर तुम्हाला जेवणानंतर काही गोष्टी करण्याची सवय असल्यास तर आधीच सावध व्हा, नाहीतर आरोग्यास नुकसान होईल.

◆ जेवल्यानंतर चहा पिण्याची सवय टाळा. कारण यामुळे जेवलेले अन्न पचण्यासाठी समस्या येते. जेवणाच्या एक तास आधी किंवा एक तासानंतर चहा किंवा कॉफी न पिण्याचा डॉक्टरांकडून सल्ला दिला जातो. या सवयीमुळे ॲनिमिया होण्याची शक्यता असते.

◆ फळ उपाशीपोटी खाणे आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते. मात्र सकाळचा पोटभर नाश्ता केल्यानंतर फळ खाणे टाळा. कारण नाश्त्यानंतर फळ खाल्ल्यास ते पचण्यास समस्या येईल. फळांचे सेवन तुम्ही संध्याकाळी केले तरी त्याचा धोका उद्भवत नाही.

◆ पचनासाठी पाणी हा उत्तम उपाय आहे. परंतु जेवल्यावर लगेच पाणी पिऊ नका. खासकरून थंड पाणी पिणे टाळा. त्यामुळे पचनक्रिया धिम्या गतीने होते. त्यामुळे जेवल्यानंतर या करू नका. तसेच सिगारेट पिणे, दारू पिणे या सवयी सुद्धा जेवल्यानंतर केल्यास आरोग्यास धोकादायक ठरू शकतात. तर काही जण जेवण झाल्यानंतर आणि झोपण्यापूर्वी अंघोळ करतात. पण ही सवय वाईट असून त्यामुळे शरीरातील रक्तपुरवठा सुरळीत सुरू राहण्यास अडथळा निर्माण होतो.



# तुमच्या हातातील व्हॉट्सअ‍ॅपमध्ये आता एआयचा शिरकाव; तुम्ही म्हणाल तसे स्टिकर्स बनवून देणार

व्हॉट्सअ‍ॅप लवकरच एक नवीन फीचर सादर करू शकतं, ज्यामुळे तुम्ही सहज एआय स्टिकर जनरेट करू शकाल. हे फीचर कसं वापरायचं चला जाणून घेऊया. सध्या हे फीचर बीटा टेस्टिंगसाठी उपलब्ध आहे. इन्स्टंट मेसेजिंग ॲप व्हॉट्सअ‍ॅप बीटानं आपल्या प्लॅटफॉर्मवर एआय स्टिकरचा सपोर्ट ॲड केला आहे. व्हॉट्सॲपवर हे पहिलं फीचर आहे, जे आर्टिफिशियल इंटेलिजेंसचा वापर करेल आणि एआय स्टिकर बनवण्यास मदत करेल.

एआय स्टिकर बनवण्याचा पर्याय फक्त अँड्रॉइड २.२३.१७.१४ अपडेटमध्ये उपलब्ध आहे, ज्याचा वापर फक्त काही निवडक व्हॉट्सअ‍ॅप बीटा युजर्सच करू शकतात. ही नवीन सर्व्हिस युजर्सना पर्सनलाइज्ड स्टिकर्स बनवण्यास मदत करेल. पुढील काही दिवसांमध्ये हे फीचर सर्व युजर्ससाठी जगभरात रोलआऊट केलं जाऊ शकतं. या फीचरबाबत WABetaInfoनं आपल्या रिपोर्टमध्ये सांगितलं आहे की, नवीन अपडेटमधून आलेलं हे फीचर सध्या मर्यादित टेस्टर्ससाठी उपलब्ध झालं आहे. इतर स्टिकरप्रमाणे, एआय-जनरेटेड स्टिकर देखील स्टिकर टॅबमध्ये ठेवण्यात आले आहेत. स्टिकर जेनरेट करण्यासाठी युजर्सना नवीन क्रिएट बटनवर टॅप करावं लागेल.



◆ व्हॉट्सॲप चॅटमध्ये, स्टिकर विंडो ओपन करण्यासाठी खाली दिलेल्या स्माईली आयकॉनवर टॅप करा.

◆ जेव्हा तुम्हाला हा अपडेट मिळेल, तेव्हा एक पर्याय देण्यात येईल जेनरेट युअर ओन एआय स्टिकरवर टॅप करा.

◆ हे फीचर कधीपर्यंत युजर्ससाठी उपलब्ध होईल, यासाठी व्हॉट्सॲपनं सध्या कोणतीही टाइमलाइन दिली नाही. तसेच मेटानं या जेनरेटिव्ह एआयचं नाव देखील सांगितलेलं नाही, ज्याच्या मदतीनं हे स्टिकर्स बनवले जातील. आताही कंपनीनं स्वतः तयार केलेली एआय टेक्नॉलॉजी आहे की इतर कोणत्या टेक कंपनीशी मेटानं हातमिळवणी केली आहे, ते पाहावं लागेल. तसेच हे स्टिकर्स जेनरेट करताना काही मर्यादा असतील की नाही ते देखील फीचर सर्वांसाठी उपलब्ध झाल्यावरच समजेल.

# थकवा दूर करण्यासाठी ग्रीन टी फेसपॅक

चेहऱ्यावर चमक आणण्यासाठी घरगुती फेसपॅक सर्वोत्तम ठरतो. जेव्हा स्कीन थकलेली किंवा डल वाटत असेल तेव्हा तांदूळ आणि ग्रीन टीचा घरी तयार केलेला फेसपॅक स्किनला रिलॅक्स होण्यास मदत करेल. बघू कसा तयार करायचा हा पॅक...

◆ **सामग्री :** लिंबू, ग्रीन टी, २-३ थेंब पेपरमिंट किंवा टी ट्री तेल.


◆ **कृती :** एका वाडग्यात २ चमचे तांदळाचे पीठ घेऊन त्यात १/४ चमचा लिंबाचा रस मिसळा. त्यात ताजी ग्रीन टी मिसळा. क्रीमसारखं होईपर्यंत मिसळत राहा. आता या पॅकमध्ये ३ ते ४ थेंब पेपरमिंट किंवा टी ट्री तेलाचे मिसळा.

◆ **लावण्याचा विधी :** आपला चेहरा कोमट पाण्याने धुऊन घ्या. मग



चेहरा आणि मानेवर पॅक लावा. २० मिनिटानंतर पॅक धुऊन टाका. चेहरा पुसून मॉइश्चरायझर लावा.

# "रामायण" चित्रपटातील रणबीर कपूर व साई पल्लवीचा फोटो व्हायरल, पाहा दोघं कसे दिसतात



बॉलीवूड सुपरस्टार रणबीर कपूर सध्या 'रामायण' या त्याच्या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. नितेश तिवारी दिग्दर्शित 'रामायण' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात मुख्य भूमिका साकारणाऱ्या कलाकारांची माहिती आतापर्यंत लपवून ठेवण्यात आली होती. परंतु, अलीकडेच या चित्रपटातील प्रभू श्रीराम आणि देवी सीता या भूमिका साकारत असलेल्या कलाकारांचा पहिला लूक समोर आला आहे. सोशल मीडियावर 'रामायण' सेटवरील एक फोटो तुफान व्हायरल होत आहे. या फोटोमध्ये प्रभू श्रीराम यांच्या भूमिकेत रणबीर कपूर; तर देवी सीतेच्या भूमिकेत साउथ स्टार साई पल्लवी दिसत आहे. हे व्हायरल झालेले फोटो अधिकृतरीत्या 'झूम टीव्ही'ला प्राप्त झाले आहेत. 'रामायण'च्या सेटवरून हे फोटोज लीक झाले आहेत. अयोध्येचे युवराज प्रभू श्रीराम यांच्यासारखे पारंपरिक कपडे रणबीरने परिधान केले होते. तर साईने देवी सीता यांच्यासारखी वेशभूषा केली होती. 'झूम टीव्ही'ने शनिवारी त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवरून हे एक्सक्ल्युझिव्ह फोटो शेअर केले. या चित्रपटाद्वारे रणबीर आणि साई पल्लवीने पहिल्यांदाच एकत्रित काम केले आहे. भगवान रामाच्या भूमिकेसाठी रणबीर शाकाहारी आहार आणि वर्कआउट रूटीनचे पालन करीत असल्याची चर्चा सुरू होती. रणबीर आणि साई पल्लवी यांचे हे फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत. काही चाहत्यांनी आपल्या प्रतिक्रिया देत, चित्रपटासाठी शुभेच्छा दिल्या आहेत; तर काही नेटकऱ्यांनी साई पल्लवी आणि रणबीर यांच्या या जोडीला ट्रोलदेखील केले आहे. "हा चित्रपट सुपर फ्लॉप होणार आहे", अशी कमेंट एका नेटकऱ्याने केली. "रणबीर अजिबात प्रभू श्रीराम यांच्यासारखा दिसत नाही," असे एक युजर म्हणाला. "हे अतिशय निराशाजनक आहे. मालिकांमध्येही यापेक्षा चांगले पोशाख असतात," अशी कमेंट एकाने केली. याआधी रणबीर ॲनिमल या चित्रपटात झळकला होता. या चित्रपटाने बक्कळ कमाई केली; पण हा चित्रपट वादग्रस्त ठरला. या चित्रपटात रणबीरबरोबर रश्मिका मंदाना, तृप्ती डिमरी, अनिल कपूर, बॉबी देओल हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकांत दिसले होते. दरम्यान, रामायण चित्रपटाबद्दल सांगायचे झाल्यास, नितेश तिवारी यांचा 'रामायण' चित्रपट ऋषी वाल्मीकी यांच्या महाकाव्यावर आधारित आहे. रणबीर प्रभू श्रीराम यांच्या भूमिकेत; तर देवी सीतेच्या भूमिकेत साई पल्लवी दिसणार आहे. केजीएफ स्टार यश या चित्रपटात रावणाची भूमिका साकारणार असल्याचीदेखील चर्चा आहे.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ६८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | | | | 8 | 1 | | 4 | 2 |
| 7 | | 4 | | 5 | 3 | | 6 | |
| | 1 | | | 6 | | | | 8 |
| | 9 | 5 | | 3 | 4 | | | |
| 1 | 3 | | | 7 | 2 | | | 5 |
| | | 7 | | | | | | |
| | | 9 | | 2 | | | 8 | |
| 2 | | | | | | 5 | 3 | |
| | | 8 | 7 | | | 6 | | |

## उत्तर सुडोकू -६७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 3 | 2 | 9 | 7 | 5 | 8 | 1 | 6 |
| 9 | 6 | 8 | 2 | 4 | 1 | 3 | 5 | 7 |
| 5 | 7 | 1 | 3 | 6 | 8 | 9 | 2 | 4 |
| 2 | 8 | 6 | 4 | 9 | 7 | 5 | 3 | 1 |
| 7 | 9 | 4 | 5 | 1 | 3 | 2 | 6 | 8 |
| 1 | 5 | 3 | 6 | 8 | 2 | 7 | 4 | 9 |
| 3 | 4 | 7 | 1 | 5 | 9 | 6 | 8 | 2 |
| 6 | 2 | 9 | 8 | 3 | 4 | 1 | 7 | 5 |
| 8 | 1 | 5 | 7 | 2 | 6 | 4 | 9 | 3 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

# कुशल बद्रिकेला बायकोनं लावलं कामाला फोटो शेअर करत म्हणाला, "एका भांडणात..."



ह्यचला हवा येऊ द्याह्नमधून घराघरात पोहोचलेला अभिनेता कुशल बद्रिके नेहमी चर्चेत असतो. कुशलने आपल्या अभिनयाने आणि विनोदी शैलीनं मराठी मनोरंजनसृष्टीत एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे त्याचा एक वेगळा चाहता वर्ग तयार झाला आहे. सध्या कुशल सोनी टीव्हीवरील 'मॅडनेस मचाएंगे' या हिंदी कार्यक्रमात पाहायला मिळत आहे. या कार्यक्रमात तो अभिनेत्री हेमांगी कवीसह दिसत आहे. 'मॅडनेस मचाएंगे' कार्यक्रमातून त्याने अनेकांची मनं जिंकली आहेत. कुशल नेहमी या कार्यक्रमातील स्किटचे व्हिडीओ शेअर करत असतो. त्यावर चाहते त्याचं कौतुक करत असतात. अशातच कुशलने इन्स्टाग्रामवर एक फोटो शेअर केला आहे; जो चांगलाच व्हायरल झाला आहे. या फोटोमध्ये कुशलच्या हातात बॅग आणि इतर सामान दिसत आहे. तर त्याची बायको सुनयना रिकाम्या हाताने त्याच्या पुढे चालताना पाहायला मिळत आहे. हा फोटो शेअर करत कुशलने लिहिलं आहे, "मागे एका भांडणात ही म्हणाली होती, सगळ्या संसाराचा भार हिने एकटीनेच उचललाय म्हणून." कुशलचा हा फोटो पाहून इतर कलाकार मंडळींसह चाहत्यांनी भरभरून प्रतिक्रिया दिल्या आहेत. अवधूत गुप्ते, तेजस्विनी पंडीत, नम्रता संभेराव, शर्मिला शिंदे अशा अनेकांनी कुशलच्या या पोस्टवर हसण्याचे इमोजी शेअर करून प्रतिक्रिया दिल्या आहेत. "घरातील विषय सार्वजनिक नका करू दादा..गरम पोळ्या बंद होतील ना तुमच्या", "कशी नशिबानं थट्टा आज मांडली", "आज सगळं पुराव्यासहित उत्तर दिलं", अशा मजेशीर प्रतिक्रिया चाहत्यांनी केल्या आहेत.

## दिनविशेष

### २८ एप्रिल

- ◆१९१६: होम रुल लीगची स्थापना झाली.
- ◆१९२०: अझरबैजान यांचा सोविएत युनियनमधे समावेश झाला.
- ◆ १९६९: चार्ल्स गॉल यांनी फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षपदाचा राजीनामा दिला.
- ◆२००१: डेनिस टिटो हे पैसे देउन अंतराळात प्रवास करणारे पहिला अंतराळप्रवासी झाले.
- ◆२००३: ॲपल कम्प्यूटर इन्क. ने आयट्यून्स स्टोअर प्रकाशित केले.
- ◆१७५८: अमेरिकेचे ५ वे राष्ट्राध्यक्ष जेम्स मोन्रो यांचा जन्म. (मृत्यू: ४ जुलै १८३१)
- ◆१८५४: लोकमान्य टिळकांचे निकटचे सहकारी वासुकाका जोशी यांचा जन्म. (मृत्यू: १२ जानेवारी १९४४)
- ◆१९०८: ऑस्ट्रियाचे व्यापारी व नाझीविरोधी ऑस्कार शिंडलर यांचा जन्म.
- ◆१९१६: प्रसिद्ध लक्झरी स्पोर्ट्स कार लॅम्बोर्गिनी चे निर्माते फारूशियो लॅम्बोर्गिनी यांचा इटली येथे जन्म. (मृत्यू: २० फेब्रुवारी १९९३)
- ◆१९३१: लेखक मधु मंगेश कर्णिक यांचा जन्म.
- ◆१९३७: इराकी हुकूमशहा आणि इराकचे ५वे अध्यक्ष सद्दाम हुसेन यांचा जन्म. (मृत्यू: ३० डिसेंबर २००६)
- ◆१९४२: इंग्लिश क्रिकेटर माईक ब्रेअर्ली यांचा जन्म.
- ◆१९६८: झिम्बाब्वेचे क्रिकेटपटू अँडी फ्लॉवर यांचा जन्म.
- ◆१७४०: थोरले बाजीराव पेशवे ऊर्फ श्रीमंत बाजीराव बल्लाळ बाळाजी भट यांचे नर्मदातीरी रावेरखेडी येथे निधन. (जन्म: १८ ऑगस्ट १७००)
- ◆१९४५: इटलीचे हुकूमशहा बेनिटो मुसोलिनी यांचा गोळ्या घालून मृत्यू. (जन्म: २९ जुलै १८८३)
- ◆१९७८: अफगाणिस्तानचे पहिले अध्यक्ष मोहम्मद दाऊद खान यांचे निधन. (जन्म: १८ जुलै १९०९)
- ◆१९९२: ज्ञानपीठ पुरस्कारविजेते कन्नड साहित्यिक आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. विनायक कृष्ण गोकाक यांचे निधन. (जन्म: ९ ऑगस्ट १९०९)
- ◆१९९८: जलदगती गोलंदाज रमाकांत देसाई यांचे निधन. (जन्म: २० जून १९३९)

## भविष्य

**मेष** असुरक्षितता अथवा आत्मविस्मृतीच्या भावनेमुळे चक्कर येईल. तुमच्या नियमित कष्टांचे आज चांगल चीज होईल.

**वृषभ** विश्रांती घ्या आणि कामात व्यग्र असताना मधेमधे थोडा आराम करा. वाईट सवयी तुम्हाला जडविण्यासाठी कारणीभूत ठरणाऱ्या व्यक्तींपासून दूर राहा.

**मिथुन** चांगल्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. तुमच्या पालकांसोबत तुमचा आनंद वाटा.

**कर्क** तुमचे विनयशील वागण्याबद्दल कौतुक होईल. अनेक लोक तुमच्यावर स्तुतिसुमने उधळतील. मित्रांच्या मदतीमुळे आर्थिक अडचण सुकर होईल.

**सिंह** तुमच्या विचारांवर ज्यांचा असाधारण प्रभाव आहे अशा विशेष व्यक्तीची ओळख मित्रामुळे होऊ शकते. किरकोळ आणि ठोक व्यापाऱ्यांसाठी चांगला दिवस.

**कन्या** अलिकडे घडलेल्या घटनांमुळे तुमचे चित्त विचलित होईल. ध्यानधारणा आणि योगासने यामुळे तुम्हाला शारीरिक व अध्यात्मिक फायदा होईल. आज कार्य क्षेत्रात तुमच्या कुणी जुन्या कामाचे कौतुक होऊ शकते.

**तुला** भावनिकदृष्ट्या तुम्ही स्थिर व्यक्ती नाही आहात, त्यामुळे इतरांसमोर कसे वागता बोलता त्याबाबत सावध असणे योग्य ठरेल. स्थावर जंगम मालमत्ता गुंतवणूक लाभदायी ठरेल.

**वृश्चिक** विनाकारण स्वतःची निंदा करून तुमचा उत्साह घालवू नका. दिवसाच्या उत्तरार्धात आराम करा. कामातील दबावामुळे मानसिक खळबळ आणि अशांती वाढेल.

**धनु** आजच्या दिवशी तब्येत एकदम उत्तम असेल. तुम्हाला जिथे बोलण्याची गरज नाही तिथे तुम्ही बोलू नका. जबरदस्ती बोलण्याच्या कारणाने तुम्ही स्वतःला चिंतेत टाकू शकतात.

**मकर** तुमच्या वडिलांचा सल्ला आज तुम्हाला कामाच्या क्षेत्रात धन लाभ करवून देऊ शकतो. तुमचे हसतमुख वागणे कुटुंब जीवन प्रकाशमान करतील. शक्य असेल तर लांबचा प्रवास टाळणे चांगले.

**कुंभ** तुमचे व्यक्तिमत्व सुधारण्यासाठी कठोर प्रयत्न करा. तुम्हाला एकाकी वाटेल तेव्हा तुम्ही तुमच्या कुटूंबियांची मदत घ्या. त्यामुळे नैराश्यापासून तुमचा बचाव होईल. परिणामी सुयोग्य, संयुक्तिक निर्णय घेण्यास तुम्हाला मदत होईल.

**मीन** आजवर दबून राहीलेले सुप्त प्रश्न उभे राहील्यामुळे मानसिक तणाव येऊ शकतो. आज तुम्ही सहजपणे भांडवल उभे कराल - राहिलेली देणी परत मिळवाल - किंवा नवीन प्रकल्पांसाठी निधी मागाल. कुटुंबाच्या कल्याणासाठी मेहनत करा.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

संपादकीय

# सोयीनुसार ईव्हीएमची बदनामी

कोणत्याही देशाच्या लोकशाही मूल्यांसाठी स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणुका महत्त्वाच्या असतात. निष्पक्ष, अचूक आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रियेचा परिणाम मतदानवाढीवरही होऊ शकतो. ही प्रक्रिया पारदर्शक करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन अर्थात ईव्हीएमचा वापर १९९९ च्या निवडणुकांमध्ये अंशतः आणि २००४ पासून पूर्णतः केला जाऊ लागला, पण २०१४ ला नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर ईव्हीएम प्रणालीवरच संशय व्यक्त केला जाऊ लागला. गेल्या दोन निवडणुकांप्रमाणेच यंदाच्याही निवडणुकीत ईव्हीएम हाच कळीचा मुद्दा बनला आहे. सध्या मोदी लाट नसून केंद्रातील मोदी सरकारला यंदा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे, मात्र केवळ ईव्हीएम मॅनेज केले जात असल्यामुळेच मोदींची ५६ इंची छाती फुगते. या जोरावरच ते पुन्हा सत्तेवर येण्याची 'गॅरंटी' देताहेत, असा थेट आरोप इंडिया आघाडीकडून होत आहे. या आरोपाच्याच अनुषंगाने ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट पावत्यांची १०० टक्के पडताळणी करण्याची मागणी एका याचिकेद्वारे सर्वोच्च न्यायालयात करण्यात आली, मात्र यासंदर्भातील निर्णय राखून ठेवताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, केंद्रीय निवडणूक आयोगाने ईव्हीएमसंदर्भातील सर्व तांत्रिक शंकांचे समाधान केले आहे. प्राप्त अहवालानुसार ईव्हीएम हॅक केल्याची किंवा त्यात काही गडबड झाल्याची एकही घटना घडलेली नाही. केवळ ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटवर संशय आहे. या आधारावर आम्ही कारवाईचा आदेश कसा द्यायचा, असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केला आहे. यावरून ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटच्या विरोधातील एकही सबळ पुरावा न्यायालयात सादर करण्यात आला नसल्याचे स्पष्ट होते. न्यायालयाने या एकमेव याचिकेत ईव्हीएमसंदर्भात विश्वास दर्शवला असेही नाही. अन्य एका याचिकेत याचिकाकर्त्याने अशी भीती व्यक्त केली होती की, २०१६ ते २०१९ दरम्यान भारत निवडणूक आयोगाच्या कोठडीतून गहाळ झालेल्या १९ लाख ईव्हीएमचा वापर यंदाच्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत फेरफार करण्यासाठी होऊ शकतो, मात्र सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएम प्रणालीवर विश्वास दर्शवत ईव्हीएमचा वापर टाळून बॅलेट पेपरचा वापर करण्याबाबतच्या दोन्ही याचिका काही दिवसांपूर्वीच फेटाळल्या. १९ लाख गहाळ ईव्हीएम याचिकेप्रकरणी निर्णय देताना अशा शंका आणि आरोप पूर्णपणे निराधार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. लोकप्रतिनिधी कायदा १९५१ चे कलम ६१ अ बाजूला सारून बॅलेट पेपर वापरून निवडणुका घेण्यासंदर्भातील आणखी एका याचिकेवर सुनावणी करण्यास नकार देताना न्यायमूर्ती खन्ना यांनी निरीक्षण नोंदविले की, ईव्हीएमच्या कामकाजाशी संबंधित विविध मुद्द्यांवर दहाहून अधिक प्रकरणे तपासण्यात आली आहेत. न्यायालयाने वेळोवेळी याचिका फेटाळताना ईव्हीएमच्या कार्यपद्धतीवर नेहमीच विश्वास दर्शवला आहे. गेल्या दशकात आणि सुमारे ४० निकालांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने भारत निवडणूक आयोग, ईव्हीएम आणि या संबंधांतील पारदर्शक प्रक्रियेवरील त्यांची श्रद्धा आणि विश्वास कायम ठेवला आहे. मध्य प्रदेश जन विकास पक्ष विरुद्ध भारतीय निवडणूक आयोग, विशेष रजा याचिकेच्या अलीकडील एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने अर्जदारास ५० हजार रुपये एवढा दंड ठोठावला आहे. याचिकाकर्त्याने असे निरीक्षण नोंदवले की, देशात अनेक दशकांपासून ईव्हीएमचा वापर केला जात आहे, परंतु वेळोवेळी उपस्थित केलेले मुद्दे खोडण्यात आले आहेत. दिल्ली उच्च न्यायालयानेदेखील अशाच एका याचिकाकर्त्याला १० हजार रुपयांचा दंड ठोठावला होता, ज्यामध्ये ईव्हीएमचा वापर थांबवण्यास सांगून आगामी सर्व निवडणुकांमध्ये ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपर वापरण्याचे अर्जदाराने नमूद केले होते. त्याआधी दिल्ली उच्च न्यायालयाने आगामी लोकसभा निवडणुकीत वापरल्या जाणाऱ्या ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटसाठी सुरू असलेली प्रथमस्तरीय तपासणी प्रक्रिया संपुष्टात आणण्याची दिल्ली प्रदेश काँग्रेस कमिटीने केलेली विनंती याचिका फेटाळून लावली होती. ईव्हीएम मशिनने निवडणुकीचा मोठा खर्च वाचवला आहे. मत कुणालाही द्या, ईव्हीएममध्ये हे मत केवळ भाजपच्याच उमेदवारांना पडते, असाही दावा ठिकठिकाणी केला जातोय. वास्तविक ईव्हीएम मशिनमध्ये गेल्या काही वर्षांत ज्या सुधारणा केल्या आहेत ते बघता या मशिनवर अविश्वास ठेवणेच मूर्खपणाचे ठरेल. ईव्हीएमने अपप्रकार होतात, असा दावा करणाऱ्यांनी यापूर्वी बॅलेट पेपर प्रणालीत गैरप्रकार होत नव्हते का, या प्रश्नाचेही उत्तर देणे आवश्यक आहे. आज ईव्हीएम प्रणालीवरील मतदारांचा विश्वास वाढणे गरजेचे आहे. त्यासाठी निवडणूक आयोगाने पुढाकार घेऊन शंकांचे निरसन करायला हवे. जर जुन्या कागदांच्या मतपत्रिकेवर आपण परतलो तर जुने आजार, जुन्या समस्या पुन्हा डोके वर काढतील. मतपत्रिका हिसकावून घेणे, गायब करण्याचे प्रकार होतील. बूथ कॅप्चरिंग तर खूप सोपे होईल आणि मतमोजणीतील हेराफेरीही सोपी होईल. निवडणूक आयोगाची प्रतिमा निश्चितच मलिन झाली आहे, पण यासाठी मतदानाची प्रक्रियाच बदलणे हा चुकीचा उपाय ठरेल. भाजपकडून सातत्याने केले जाणारे ईव्हीएम आणि निवडणूक आयोगाचे समर्थन ही बाबदेखील या दोन्ही प्रणालींवरील विश्वास कमी होण्यासाठी कारणीभूत ठरत आहे. यामुळे भाजपनेदेखील आक्रमक शैलीत ईव्हीएम आणि निवडणूक आयोगाचे समर्थन करणे बंद करावे. ज्याचे काम त्यालाच करू द्यावे. काही वर्षांपूर्वी भाजपचेच नेते निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर ईव्हीएमविरुद्ध पुस्तकच लिहून ती बदलण्याची मागणी करत होते, हेदेखील विसरता येणार नाही.

# नद्या, नाल्यांचे प्रदूषण रोखले तरच सफाईला अर्थ!



**दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च केल्यानंतरही मुंबईतील नद्या आणि नाले हे स्वच्छ झालेले कधी पाहायला मिळत नाहीत. नद्या आणि नाले स्वच्छ राहण्यासाठी यामध्ये होणारे प्रदूषण सर्वात आधी रोखणे गरजेचे आहे. नद्या आणि नाल्यांमधील प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजनाच करण्यात आल्या नाहीत तर कितीही प्रमाणात साफसफाईसाठी खर्च करण्यात आला तरी वारंवार होणाऱ्या प्रदूषणामुळे तेथील अस्वच्छता काही दूर होणार नाही. त्यामुळे नद्या, नाल्यांमधील प्रदूषण रोखण्यासाठी व्यापक प्रयत्न होणे गरजेचे आहे. तेव्हाच खऱ्या अर्थाने त्यांची साफसफाई होईल. अन्यथा परिस्थिती हाताबाहेर जाईल. मुंबईतील नद्या, नाल्यांना मिळालेले गटारगंगेचे स्वरूप बदलणार तरी कधी? कचरा आणि निर्माल्याबाबत महापालिकेने प्रयत्न केले आहेत. तसेच नद्यांमध्ये सोडले जाणारे सांडपाणी रोखण्यासाठीही प्रयत्न होणे गरजेचे आहे. हे सांडपाणी मलनिःसारण केंद्राकडे वळविण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.**

पावसाळ्यात मुंबईची तुंबई होऊ नये म्हणून मुंबई महापालिका प्रशासनाकडून दरवर्षी नद्या आणि नालेसफाईचे काम केले जाते. उन्हाळ्याला सुरुवात झाली की, मुंबईतील नद्या आणि नालेसफाईच्या कामांना वेग येतो. यंदाही पावसाळा पूर्वतयारी म्हणून महापालिका प्रशानसनाच्या वतीने हे काम वेगाने करण्यात येत असून आतापर्यंत जवळपास ५० टक्के मोहीम महापालिकेने फत्तेही केली आहे. आतापर्यंत ४ लाख ८६ हजार ३७८ मेट्रिक टनाहून अधिक गाळ नद्या, नाल्यांमधून काढण्यात आला असून एकूण १० लाख २१ हजार ७८२ मेट्रिक टन गाळ उपसा करण्याचे उद्दिष्ट महापालिकेने ठेवले आहे. नद्या आणि नालेसफाईचे काम महापालिका प्रशासनाकडून कदाचित हे काम वेळेत किंवा वेळेआधीही पूर्ण होईल, परंतु ज्या उद्देशाने हे काम करण्यात येत आहे, तो उद्देश सफल होईल का, याची मात्र शाश्वती देता येत नाही. कारण मुंबईतील नद्या, नालेसफाईंची कामे काही यंदाच होताहेत, असे नाही. गेल्या अनेक वर्षांपासून मुंबईत नद्या, नालेसफाईंची कामे प्राधान्याने महापालिका प्रशासनाकडून करण्यात येतात, परंतु अधिक पाऊस शहरात झाल्यानंतर मुंबईची तुंबई होणे काही थांबत नाही. गेल्या अनेक वर्षांपासून मुंबईकरांच्या गाठीशी हाच अनुभव कायम आहे. त्यामुळे कोट्यवधींचा खर्च नद्या आणि नालेसफाईसाठी केल्यानंतरही पावसाळ्यात मुंबईतील सखल भाग पाण्याखाली जाणारच असेल, तर दरवर्षी इतका खर्च का करावा, असा प्रश्न मुंबईकरांना पडल्याशिवाय राहत नाही.

शिवाय नद्या आणि नालेसफाईच्या कामात होणाऱ्या आर्थिक गैरव्यवहारांबाबत सत्ताधारी आणि विरोधकांमधील होर्णाया आरोप-प्रत्योरापांच्या फैरीमुळे नद्या, नालेसफाईतील गाळपेक्षा भ्रष्टाचाराचाच दुर्गंध शहरात अधिक पसरतो. उदाहरण घ्यायचेच झाल्यास मिठी नदीच्या सफाईचे घेता येईल. मिठी नदीच्या सफाईसाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आल्याबाबत विशेष तपास पथकाकडून (एसआयटी) चौकशी करण्याचा निर्णय अलीकडेच राज्य सरकारने घेतला. सत्ताधारी भारतीय जनता पक्षाचे विधान परिषद सदस्य प्रसाद लाड यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान मिठी नदीच्या साफसफाईचा मुद्दा उपस्थित केला.

गेल्या अनेक वर्षांपासून मिठी नदीच्या सफाईचे काम सुरू असून यासाठी आतापर्यंत कोट्यवधी रुपये खर्च झाले आहेत, मात्र ज्याप्रमाणात खर्च झाला त्या तुलनेत साफसफाई झाल्याचे पाहायला मिळत नाही. याची चौकशी करण्याची मागणी त्यांनी सभागृहात लावून धरल्यानंतर याबाबत एसआयटी चौकशी करण्याचा निर्णय सरकारकडून घेण्यात आला. एसआयटी चौकशीतून आर्थिक भ्रष्टाचाराच्या रहस्याचा उलगडा होईल की नाही, हे आत्ताच सांगणे कठीण आहे, परंतु अर्थसंकल्पीय अधिवेशनात मिठी नदीच्या सफाईबाबतचा जो मुद्दा उपस्थित करण्यात आला, त्यावर खरेच विचार होणे गरजेचे आहे. केवळ मिठी नदीच नाही, तर मुंबईतील इतर नद्या आणि नालेसफाईबाबत इतक्या वर्षात कोट्यवधींचा खर्च करूनही मुंबईतील नद्या कधीच पूर्णपणे स्वच्छ आणि नाल्यांची योग्यरित्या सफाई झाल्याचे पाहायला मिळत नाही. असे का होते, याचे उत्तर मुंबईकरांना कोण देणार? आणखी किती वर्षे हाच सिलसिला सुरू राहणार? साफसफाईच्या नावाखाली कोट्यवधी रुपये वर्षानुवर्षे यात खर्ची घालायचे, परंतु त्याबदल्यात मुंबईकरांना काय मिळणार? मुंबईची तुंबई होऊन पुन्हा पालथ्या घड्यावर पाणी? अस्वच्छ नद्या आणि गलिच्छ नाले हे आणखी किती काळ मुंबईकरांनी सहन करायचे?

नदी आणि नाल्यांतील गाळ काढल्यानंतर काही काळासाठी येथून पाण्याचा प्रवाह व्यवस्थित होताना दिसतो, मात्र त्यानंतर परिस्थिती पुन्हा पूर्ववत झाल्याचे पाहायला मिळते. मोठ्या प्रमाणात याठिकाणी कचरा फेकला गेल्याने नाले तुंबतात. येथील पाण्याचा प्रवाह थांबल्याने दुर्गंधी पसरते. परिणामी रोगराईला निमंत्रण. मुंबईत हे काही नवीन नाही. पावसाळ्यात मोठा पाऊस झाल्यानंतर तुंबलेल्या नाल्यांमधील कचरा आणि प्रदूषित सांडपाणी हे अनेकदा रस्त्यावर येते. यामधूनच वाट काढण्यासाठी अनेकांना कसरत करावी लागते. अगदीच मोठा पाऊस आला, तर नाल्यांमधील घाण वाहून जाऊन पाण्याचा प्रवाह पुन्हा एकदा सुरू होतो, परंतु अनेकदा स्थानिक नागरिकांकडून येथे सवयीप्रमाणे कचरा टाकण्यास सुरुवात होताच पुन्हा परिस्थिती जैसे थे होते.

जोपर्यंत येथून गाळ काढण्याची प्रक्रिया शासकीय स्तरावर होत नाही, तोपर्यंत मुंबईतील बहुतांश नाले हे तुंबलेल्या अवस्थेतच राहणार. मुंबईतील नाल्यांबाबत सांगायचे झाल्यास बहुतांश वेळी दोनदाच त्यांची सफाई झाल्याचे आढळते. एक तर महापालिकेकडून येथे गाळ काढला जातो तेव्हा, अन्यथा मोठा पाऊस येतो तेव्हा. याखेरीज नाल्यांची सफाई झाल्याचे मुंबईकरांच्या दृष्टीस पडणे मुश्कीलच. रोगराई पसरू नये म्हणून दर आठवड्याला अथवा किमान महिनाभरातून तरी एकदा नाल्यांमधील गाळ उचलण्याची कार्यवाही गरजेची आहे. सफाई होण्याच्या प्रक्रियेसोबतच नाल्यांमध्ये स्थानिक नागरिकांकडून कचरा टाकण्यात येऊ नये यासाठी उपाययोजना करण्याची गरज आहे. मुंबईत नाले असर्णाया परिसरात ठिकठिकाणी कचरापेट्या असाव्यात जेणेकरून नागरिक कचरा नाल्यामध्ये न फेकता तेथील कचरापेट्यांमध्ये फेकतील. तसेच या कचरापेट्यांमधील कचरा उचलण्याची कार्यवाहीदेखील वेळोवेळी होणे गरजेचे आहे, अन्यथा तो वेळीच न उचलला गेल्यास कचरापेट्यांची क्षमता संपते आणि मग कचरा हा पेट्यांमधून बाहेर पडून तो नाल्यात फेकण्यास सुरुवात होते. परिणामी दुर्गंधी आणि रोगराईला निमंत्रण तर मिळतेच शिवाय नालेही तुंबण्यास सुरुवात होते. म्हणूनच नाला परिसरात कचरापेट्या असणे आवश्यक आहे.

नाल्यांप्रमाणेच अनेकदा मुंबईतील नद्यांमध्ये अनेकांकडून निर्माल्य तसेच इतर टाकाऊ घटक, कारखान्यांमधील रासायनिक सांडपाणी, अनेकांच्या घरातील प्रदूषित सांडपाणी सर्रासपणे सोडले जाते. त्यामुळे नद्याही मोठ्या प्रमाणात प्रदूषित होतात. मुंबईत तर परिस्थिती इतकी भयानक आहे की, नाले कुठले आणि नद्या कुठल्या हेसुद्धा कळेनासे झाले आहे. नाल्यांची स्थिती ही कचराभूमीप्रमाणे झाली असून नद्या या नाल्यांसारख्या झाल्या आहेत. येथे होणारे प्रदूषण वेळीच न रोखले गेले तर नद्यांची जागाही भविष्यात कचराभूमी झाल्याशिवाय राहणार नाही, हे काही वेगळे सांगण्याची गरज नाही. त्यामुळे प्रदूषण रोखण्यासाठी वेळीच उपाययोजना करण्याची गरज आहे. अलीकडेच वृत्त होते की, नद्या आणि नाल्यांमधील दिवसेंदिवस वाढते प्रदूषण रोखण्यासाठी मुंबई महापालिका प्रशासन उपाययोजना करण्यासाठी येथे लोखंडी जाळ्या बसविण्यासाठी प्रयत्नशील आहे. जेणेकरून येथे होणाऱ्या प्रदूषणाला आळा घालता येईल. नद्या, नाले आदी परिसरांमध्ये लोखंडी जाळ्या, अथवा संरक्षण भिंती बांधल्या गेल्या तर येथे टाकण्यात येणारा कचरा हा नदी, नाल्यांमध्ये पडण्यापासून वाचवता येईल.

तसेच निर्माल्य कलशांची संख्यादेखील याठिकाणी वाढविण्याच्या दृष्टीने महापालिकेकडून प्रयत्न करण्यात येणार आहेत. नदी आणि नाल्यांमध्ये कचरा आणि निर्माल्यामुळे होर्णाया समस्येवर महापालिका प्रशासनाकडून तोडगा काढण्यात येत आहे. महापालिकेच्या या प्रयत्नांना किती प्रमाणात यश मिळेल, हे येणारी वेळच सांगेल, परंतु किमान यासाठी प्रयत्न होत आहेत, हीच काय ती एक जमेची बाजू. कचरा आणि निर्माल्याबाबत महापालिकेने प्रयत्न केले आहेत. तसेच नद्यांमध्ये सोडले जाणारे सांडपाणी रोखण्यासाठीही प्रयत्न होणे गरजेचे आहे. नद्यांमध्ये सोडले जाणारे सांडपाणी मलनिःसारण केंद्राकडे वळविण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. जेणेकरून त्यावर काही प्रमाणात प्रक्रिया करून ते समुद्रामध्ये सोडले जाईल. असे केले तर नद्यांमधील प्रदूषण रोखता येईल. एकदा का प्रदूषण रोखले गेले तर नद्यांचे स्वरूपही बदलण्यास सुरुवात होईल. हे सर्व बदल काही तातडीने होताना दिसणार नाहीत, परंतु या पद्धतीने जर प्रयत्न झाले तर नक्कीच नद्यांमधील प्रदूषण निवळण्यास सुरुवात होईल.

एकदा प्रदूषण घटण्यास सुरुवात झाली तर पुन्हा त्या मोकळा श्वास घेतल्याशिवाय राहणार नाहीत. म्हणूनच नदी असो वा नाले यामधील प्रदूषण रोखणे गरजेचे आहे. यासाठी महापालिका प्रशासन प्रयत्नशील असले तरी त्यांना नागरिकांचे सहकार्य मिळणेही तितकेच गरजेचे आहे. अन्यथा महापालिकेने कितीही प्रयत्न केले तरी जर नागरिकांनी सहकार्य केले नाही तर परिस्थिती विदारक झाल्याशिवाय राहणार नाही. आपली मुंबई, स्वच्छ मुंबई ठेवण्यासाठी महापालिका प्रशासनासह नागरिकांचाही सहभाग यात तितकाच महत्वाचा आहे. कारण टाळी एका हाताने वाजत नाही, हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. प्रदूषणाला रोखूया, मुंबईला स्वच्छ बनवूया, महापालिकेच्या या आवाहनाला नागरिकांनीही प्रतिसाद द्यावा, हीच अपेक्षा...

# 26/11 Govt. Counsel Ujjwal Nikam : BJP's candidate from Mumbai North Central



**MUMBAI :** Former special public prosecutor Ujjwal Nikam will be contesting the Lok Sabha election from the Mumbai North Central constituency against Congress's Varsha Gaikwad.

The BJP decided to drop sitting MP Poonam Mahajan. Ujjwal Nikam, in his long and illustrious legal career, was associated with many cases including 1993 Bombay bombings, the Gulshan Kumar murder case, Pramod Mahajan murder case and the 2008 Mumbai attack. He was also the special public prosecutor in the 2013 Mumbai gang rape case. Ujjwal Nikam was awarded the Padma Shri in 2016.

After Ajmal Kasab was hanged, Ujjwal Nikam said it was a victory for India and by hanging Kasab, India paid homage to all the policemen and innocent people who lost their lives in the terror attack. Ujjwal Nikam is from Jalgaon and in the last elections the BJP was mulling him as a candidate from Jalgaon. The BJP has decided to drop sitting MP Poonam Mahajan as many poll surveys showed a negative rating for her. The name of Mumbai BJP chief Ashish Shelar was also being discussed but he reportedly declined to contest. Some reports claimed Bollywood actor Madhuri Dixit was also approached for the seat.


Poonam Mahajan won the seat in 2014 and 2019 defeating Congress's Priya Dutt who was the MP from 2009 to 2014. This is a seat which in 2009 saw senior lawyer Mahesh Jethmalani as a BJP candidate but he lost to Priya Dutt. Voting in Mumbai is scheduled to be held on May 20 in the fifth phase of the polls.

Poonam Mahajan is the daughter of late BJP leader Pramod Mahajan. She served as the president of the BJP's youth wing.

Maharashtra with its 48 Lok Sabha seats is the second-largest contributor to the Lok Sabha, after Uttar Pradesh. In the 2019 Lok Sabha elections, the BJP won 23 out of 25 contested seats, while the undivided Shiv Sena secured 18 out of 23 seats.

### Cut the whinging and mourning'

# Ravi Shastri's no-holds-barred 'focus' message to bowlers as IPL batting records tumble



The ongoing season of the Indian Premier League has witnessed an unprecedented display of power-hitting, setting it apart from all the previous editions. Matches have consistently seen teams surpass the 200-run mark, with the latest example being Friday night's clash between Kolkata Knight Riders and Punjab Kings. In a thrilling encounter at the Eden Gardens, Punjab Kings achieved the extraordinary feat of chasing down a colossal target of 262 runs, shattering the T20 record for the highest successful run chase in the format's history. With largely batting-friendly surfaces and the Impact Player rule, there has been a sudden surge in run-scoring. There has been a notable shift in mindset among teams this season as they have revamped their strategies to adopt a more aggressive approach right from the outset of the game. Sunrisers Hyderabad were one of the pioneers for such an aggressive brand of cricket, smashing the record for the highest powerplay score in IPL during their game against the Delhi Capitals, smashing 125 without losing a wicket. The aggressive batting has raised concerns over the lack of even contest between bat and ball, but former India head coach Ravi Shastri believes that bowlers need to back their strengths and stop experimenting unnecessarily. In a strongly-worded post on his official X, formerly Twitter, account, Shastri called for stopping the "whinging and mourning." "Great opportunity watching this @IPL for bowlers to focus on the time tested and execution of things that have lasted the Test of time. Rather than in pursuit to add baggage to your limited armoury that you can't execute. Get stuck in to your strengths and focus. Great OPPORTUNITY to Stand out. Cut the whinging and mourning. FOCUS. #IPL," Shastri wrote.

### कोकणात उष्णतेच्या लाटेची शक्यता

# मुंबई, ठाण्याचाही पारा चढणार



**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात तापमानाचा पारा वाढलेला आहे. विदर्भ, मराठवाडा येथील काही जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाच्या सरी बरसलेल्या असल्या तरी मुंबई, ठाणे, कोकण या भागात वाढत्या तापमानाच्या झळा बसत आहेत. हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार, पुढील तीन दिवस मुंबई आणि ठाण्यासह, कोकणात उष्णतेची लाट येऊ शकते. त्यामुळे दुपारच्या वेळी नागरिकांनी घराच्या बाहेर पडताना योग्य काळजी घ्यावी, असे आवाहनही हवामान विभागाकडून करण्यात आले आहे. आजपासून (ता. २७ एप्रिल) पुढील तीन दिवसांमध्ये मुंबई, ठाणे, रायगड या जिल्ह्यांना वाढत्या तापमानाची झळ बसू शकते. उत्तर कोकणामध्ये २८ आणि २९ एप्रिलला उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. या दोन दिवसांमध्ये तापमानाचा पारा ४० ते ४२ अंशावर जाण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तविण्यात आलेली आहे. याआधी १५ आणि १६ एप्रिल या दोन दिवसांमध्ये मुंबई आणि आसपासच्या शहरांमध्ये तापमान वाढ नोंदविण्यात आली होती. १५ आणि १६ एप्रिल रोजी नवी मुंबईचा पारा ४१ अंश आणि पनवेलचा पारा ४३ अंशावर गेला होता. मुंबई, ठाणे, कोकण या भागांत तापमानाचा पारा वाढणार असला तरी, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याचा वारा (३०-४० किमी प्रतितास वेग) हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे, असे हवामान विभागाकडून सांगण्यात आले आहे. मध्य महाराष्ट्र आणि परिसरावर चक्राकार वाऱ्याची स्थिती आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात ढगाळ हवामान होत आहे. दोन दिवसांपूर्वी नांदेड, परभणी, जालना, अमरावती, वर्धा या जिल्ह्यांमध्ये वादळी पावसाने तडाखा दिला. राज्यातील बहुतांश भागात ढगाळ वातावरण असल्याने कमाल तापमानाचा पारा सरासरीपर्यंत कमी झाल्याचे निरीक्षण हवामान खात्यातर्फे नोंदण्यात आले. पण अद्यापही राज्यावर अवकाळी पावसाचे संकट कायम आहे. त्यामुळे काही जिल्ह्यांना अवकाळी पावसाता अलर्ट हवामान खात्याकडून देण्यात आला आहे.


# Weight loss to heart health... incredible benefits of dancing explained

Dance is considered a timeless art form, captivating hearts for centuries. It goes beyond moves, rather it is a beautiful form of creative expression, filling you with boundless joy. From relieving stress, burning calories to helping you stay fit naturally, benefits of dancing abound. Whether dancing solo or in the company of others, it cultivates social connections, fostering a sense of belonging and camaraderie. If there is one way of managing weight, beating stress and loneliness, and boosting happiness, it is dancing.

International Dance Day is celebrated every year to raise awareness about the importance of this art form and encouraging people to pursue it for better physical and mental health. This year, it is being celebrated on Monday, April 29.

Dancing is a fantastic way to burn calories and stay physically active. It can also tone your muscles, make your body more flexible, and improve your heart health. Here are some amazing benefits of dancing in terms of calorie burning and overall health, as explained by Dr Sunil Chaudhary, Consultant - Internal Medicine, Fortis Escorts, Okhla Road, New Delhi.

Wonderful benefits of Dancing



1. It burns calories: Dancing can be an effective way to burn calories depending on the intensity and duration of the dance session. The number of calories burnt can vary based on factors like the type of dance, your weight, and the intensity of your movements. For example, energetic dances like salsa, hip-hop, or aerobic dance can burn a significant amount of calories in a short period.
2. Cardiovascular health: Dancing is a great cardiovascular exercise that gets your heart pumping and improves circulation. Regular dancing can help reduce the risk of heart disease, lower blood pressure, and improve overall cardiovascular fitness.
3. Muscle toning: Different styles of dance engage various muscle groups, helping to tone and strengthen your body. For instance, ballet strengthens the legs and core, while salsa and ballroom dances work on the legs, hips, and upper body. As you dance, you're essentially doing resistance training, which can lead to improved muscle tone and definition.
4. Flexibility and balance: Dancing involves a wide range of movements that improve flexibility and balance. Over time, you'll notice increased flexibility in your joints and muscles, reducing the risk of injuries and enhancing overall mobility.
5. Mood enhancement: Dancing has been shown to boost mood and reduce stress levels. The combination of physical activity, rhythmic movement, and music releases endorphins, the body's natural feel-good chemicals, which can help alleviate feelings of anxiety and depression.
6. Social interaction: Many forms of dance, such as ballroom, salsa, or group fitness classes, involve social interaction. Dancing with others can enhance social connections, improve communication skills, and foster a sense of community and belonging.
7. Weight management: Regular dancing can contribute to weight management by burning calories and increasing metabolism. When combined with a balanced diet, dancing can help you achieve and maintain a healthy weight.

Whether you're dancing alone in your room, taking a dance class, or hitting the dance floor with friends, embrace the joy of movement and reap the many health benefits that dancing has to offer.

## दुकानातून कामगारानेच रक्कम लांबवली

■ **भिवंडी** : शहरातील तीन बत्ती मार्केट मधील एका चिकन दुकानातून कामगारानेच गल्ल्यातून रोख रक्कम लांबवल्याची घटना उघडकीस आली आहे.याप्रकरणी कामगाराच्या विरोधात निजामपूरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ग्यासुद्दिन अन्सारी उर्फ साहिल असे गुन्हा दाखल झालेल्या कामगाराचे नाव आहे.तीन बत्ती मार्केट या ठिकाणी असरार हाजी अहमद मोमीन याच्या मालकीचा यासीन चिकन सेंटर नावाने दुकान आहे.दरम्यान २३ एप्रिल रोजी सायंकाळी साडे चार वाजेच्या सुमारास दुकानात काम करणाऱ्या ग्यासुद्दीनने दुकानातील गल्ल्यातून १ लाख ९ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम चोरून पोबारा केला आहे.ही बाब दुकान मालक असरारच्या लक्षात येताच त्याने ग्यासुद्दीनच्या विरोधात निजामपूरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.पोलिसांनी गुन्हा दाखल करून ग्यासुद्दीन याचा शोध सुरु केला आहे.

## गोमांस विकणाऱ्या दोघांना अटक

■ **भिवंडी** : गोवंश जातीच्या जनावरांची चोरी करत त्यांची कत्तल करून गोमांसाची दुकानात विक्री करणाऱ्या दोघांना शांतीनगर पोलिसांनी ताब्यात घेऊन बेड्या ठोकल्या आहेत.सफरअली मोहमंद शेख उर्फ गफ्फू (३६) व साकीब सईद मनियार (२३) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.सफरअली आणि साकिबने अन्य साथीदारासह संगनमत करून गोवंश जातीची जनावरे चोरून आणून या जनावरांची कत्तल करून जनावरांचे मांस विक्रीकरता शहरातील खान कंपाऊंड येथील गफ्फु बिफ या दुकानात ठेवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

## अल्पवयीन मुलगी बेपत्ता

■ **ठाणे** : ठाण्याच्या वर्तकनगर पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील लोकमान्य नगर पाडा नं ३ परिसरात राहणारी मुलगी दुकानातून काही आणण्याच्या निमित्ताने बाहेर गेली ती परत आलेली नाही. तिच्या आईने ती बेपत्ता झाल्याची तक्रार वर्तकनगर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.लोकमान्य नगर पाडा नं ३ येथे राहणाऱ्या एका महिलेची मुलगी मंगळवारी दुपारी जवळच्या मेडिकलमध्ये खरेदीसाठी जाते असे सांगून गेली. ती पुन्हा घरी आलीच नाही.कुटुंबियांनी मुलीचा मित्र परिवार, मैत्रिणी यांच्याकडे शोध घेतला. मात्र ती सापडली नाही. अखेर पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली.

# महिला, नवमतदार ठरवणार जिल्ह्याचे राजकीय भवितव्य !

## नवतरुण, महिला मतदारांमध्ये लक्षणीय वाढ

■ **ठाणे** : लोकसभा निवडणुकांसाठी ठाणे जिल्ह्याच्या मतदारसंख्येत तब्बल दोन लाखांनी वाढ झाली असून त्यात महिला आणि नवमतदारांचा टक्का मोठा आहे. त्यामुळे यंदा या जिल्ह्यातून संसदेत जाऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांचे भवितव्य प्राधान्याने महिला आणि तरुणाच्या हाती असणार आहे म्हणूनच कि काय महिला स्पेशल मतदान केंद्राबरोबरच तरुण स्पेशल मतदान केंद्रेही यावेळी असणार आहेत .

सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात ठाणे जिल्ह्यात सोमवार, २० मे २०२४ या दिवशी मतदान होणार आहे. तर मंगळवार, ४ जून २०२४ ला मतमोजणी होणार आहे .ठाणे जिल्ह्यात २३ भिवंडी,२४ कल्याण, २५ ठाणे असे तीन लोकसभा मतदार संघ असून या मतदारसंघांतर्गत येणाऱ्या १८ विधानसभा मतदारसंघात ६६ लाख ३२ हजार ४०४ मतदार असून त्यात ३५ लाख ७२ हजार ७३९ पुरुष मतदार , ३० लाख ५८ हजार ३७० महिला मतदार , १ हजार २९५ तृतीयपंथी १ लाख १ हजार ३० नवमतदार तर ५९ हजार ५ मतदार हे वयवर्ष ८५ हुन अधिक आहेत तर ३५ हजार ५६० दिव्यांग मतदार आहेत.सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर




■ सीव्हीजिल या अप्लिकेशन आचारसंहिता भंगाच्या ४३४ तक्रारी आल्या आहेत. त्यातील ३४४ तक्रारी सोडवल्या आहेत. ५ एफआयआर दाखल केले आहेत .

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी प्रसारमाध्यम प्रतिनिधींशी जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे पत्रकार परिषदेत संवाद साधला.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी २५ - ठाणे लोकसभा मतदारसंघ मनिषा जायभाये, आचारसंहिता समिती प्रमुख विजयसिंह देशमुख, कायदा व सुव्यवस्था समिती प्रमुख दीपक क्षीरसागर, उप जिल्हा निवडणूक अधिकारी अर्चना कदम यांच्यासह विविध नोडल अधिकारी उपस्थित होते.यावेळी जिल्हाधिकारी शिनगारे यांनी माहिती देताना सांगितले ,जिल्ह्यात ६ हजार ५२४ मतदान केंद्रावर मतदान करता येणार असून ही सगळी मतदान केंद्र तळमजल्यावर असणार आहेत. तर या मतदान केंद्रांपैकी २२ केंद्र महिला मतदान केंद्र , तर १८ मतदान केंद्राचे संचालन दिव्यांग करणार आहेत.

■ दरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवारांना एकूण आठ दिवसांचा अवधी असल्याचे दिसत असले तरी २७, २८ आणि १ मे रोजी तीन दिवस सुटी असल्याने उमेदवारांना केवळ पाच दिवसच उमेदवारी अर्ज भरण्याची संधी मिळणार आहे.ही निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सुमारे ६० हजार कर्मचारी व अधिकारी झटणार आहेत.

■ उमेदवारी अर्ज दाखल करताना कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. सर्व निवडणूक अधिकारी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी आणि सुरक्षेसाठी तैनात असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनाही विशेष दक्षता घेण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

■ नामनिर्देशन पत्र सादर करताना उमेदवार यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय ज्या ठिकाणी आहे तिथून साधारणपणे १०० मीटर परिसरात फक्त ३ वाहने नेण्यास परवानगी देण्यात आली आहे.



लोकसभा निवडणुकीच्या सध्या सुरू असलेल्या प्रक्रियेअंतर्गत पाचव्या टप्प्यातील निवडणुकीसाठी जिल्ह्यातील ३ लोकसभा जागांवर २६ एप्रिल पासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे.शुक्रवार ,३ मे हा उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे . उमेदवारी अर्जांची छाननी शनिवार , ४ मे ला होणार आहे . उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख ६ मे (सोमवार) दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. त्यानंतर याच दिवशी या मतदारसंघातून निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादी निश्चित केली जाणार आहे .

## वसईत प्रदुषणामुळे नागरिकांची घुसमट; आठ आरएमसी प्लांटमुळे धुळीचे साम्राज्य

■ **वसई**: वसई पूर्वेच्या मधुबन परिसरात ८ आरएमसी प्लांट तयार झाले असून त्यामुळे मोठे प्रदूषण होऊ लागले आहे. यामुळे नागरिकांना आता श्वसनाच्या तक्रारीही वाढू लागल्या आहेत. दुसरीकडे महामार्गावरील प्रदूषण करणाऱ्या आरएमसी प्लांटवर अद्याप वसई विरार महापालिकेने कारवाई केलेली नाही. त्यामुळे वसई विरारचे नागरिक आरएमसी प्लांटमुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणाच्या विळख्यात सापडले असून त्यांची घुसमट होत आहे.

वसई पूर्वेच्या मधुबन परिसर असून तेथे मोठया प्रमाणावर नागरीवस्ती होऊ लागली आहे. हा परिसर शांत आणि मोकळ्या हवेचा परिसर म्हणून ओळखला जात होता. सकाळी आणि संध्याकाळी स्थानिक येथे चालण्यासाठी येत असतात. मात्र आता या मधुबन परिसराला प्रदुषणाचा विळखा बसू लागला आहे. या परिसरात तब्बल ८ आरएससी प्लांट (रेडी मिक्स काँक्रीट) उभे राहिले आहेत. या आरएमसी प्लांटमुळे संपूर्ण मधुबन परिसर धुळीने व्यापला आहे.या प्लांटमधून मोठ्या प्रमाणात कचरा निघतो. त्याचे व्यवस्थापन होत नाही. ज्यामुळे कचरा नाल्यांमध्ये टाकला जातो आणि नाले प्रदूषित होत आहेत. वारंवार तक्रारी करूनही या प्रदुषणकारी प्लांटवर कुठलीही कारवाई करण्यात आलेली नाही. ज्यामुळे शहरात जल आणि वायू प्रदूषण वाढले आहे. तसेच नागरिकांना श्वसनाचे विकार होत आहेत असा नागरिकांनी दावा केला आहे.आरएमसी प्लांट उभारण्यासाठी अनेक परवानग्यांची आवश्यकता असते. त्यानुसार प्लांटधारकाने संबंधित महानगरपालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळ, जल (प्रतिबंधक व नियंत्रण) कायदा १९७४ नुसार परवानगी घेतली आहे का? याची तपासणी होणे अत्यंत आवश्यक आहे.

आरएमसी प्रकल्पामधून दिवस रात्र वातावरणात धूर सोडला जात आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना श्वास घेण्यासही त्रास होत असून, वातावरणातील धुलीकणामुळे परिसरातील श्वसनासंबंधीच्या आजारांत वाढ होत आहे. याबाबत प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही दखल घेतली जात नसल्याने या प्रकल्पावर कारवाई करण्यात येत नाही.



> ज्या ज्या ठिकाणी असे अनधिकृत,आरएमसी प्लांट उभे केले आहेत. त्यांची पाहणी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल,
>
> **आनंद काटोले,**
> **उप प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण ठाणे, पालघर**

> आरएमसी प्लांटमधून केमिकलयुक्त धूर बाहेर पडत असतो. तसेच सिमेंट, खडी, तयार झालेले मटेरिअल ने-आण करण्यासाठी मोठया आकाराच्या वाहनांची वर्दळ होत असते. त्या परिसरात धुरामुळे फिरणे सुद्धा ही कठीण असते. तसेच केमिकलयुक्त धुरामुळे आम्हाला खिडक्या बंद करून घरात राहण्याशिवाय पर्याय शिल्लक राहत नाही.
>
> **राजेश पाटील, नागरिक**

> मधुबनमधील आरएमसी प्लांटची तपासणी करून पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून ज्या ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्या केल्या जातील. प्लांटमधून खडी, सिमेंट, वाळू आदींचे धुलीकण बाहेर पडत असतील तर त्यासाठी पाणी शिंपडणे किंवा टरपोलिन अथवा प्लास्टिक अंथरणे असे काही उपाय करण्यास प्लांट व्यवस्थापकांना सुचना दिल्या जातील. तसेच इतर सुरक्षेच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे असेल ते करण्याच्या सुचना देखील दिल्या जातील.
>
> **अनिलकुमार पवार,**
> **आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका**

## गुणपत्रिकेवर झळकणार मतदानाचा संदेश

■ **बदलापूर** : लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला आता रंग चढू लागला असून मतदार जनजागृतीसाठी शासकीय यंत्रणांच्या माध्यमातूनही विशेष प्रयत्न होत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आता लवकरच जाहीर होणाऱ्या शाळांच्या वार्षिक परीक्षेच्या गुणपत्रिकेवरही मतदानाचा संदेश झळकणार आहे.

भिवंडी लोकसभा मतदार संघात २० मे रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर आता राजकीय पक्षांच्या प्रचाराला रंग चढू लागला आहे. दुसरीकडे शासकीय यंत्रणाही सज्ज होत असून या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा व मतदानाबाबत जनजागृती व्हावी यासाठी गेल्या काही दिवसांपासून कुळगांव बदलापूर नगर परिषद क्षेत्रात विविध कार्यक्रम उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.त्याचाच एक भाग म्हणून लवकरच जाहीर होणाऱ्या शाळांच्या वार्षिक परीक्षेच्या गुणपत्रिकेवरही मतदानाचा संदेश झळकणार असल्याची माहिती कुळगाव बदलापूर नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी विलास जड्ये यांनी दिली. मुरबाड विधानसभा मतदार संघाच्या अतिरिक्त सहाय्यक निवडणूक अधिकाऱ्यांनी कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील सर्व शाळांचे मुख्याध्यापक, प्राचार्य आदींना पत्राद्वारे मतदानाबाबत जनजागृती करण्याचे निर्देश दिले आहेत. २० मेपर्यंत शाळास्तरावर होणाऱ्या प्रत्येक पत्रव्यवहारावर तळटिप मतदान करणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. २० मे २०२४ रोजी मतदान करा ! अशा आशयाची असेल.

## बालविवाह रोखण्यासाठी विद्यार्थ्यांची माहिती ठेवा

■ **शहापूर**: शाळांना २ मे पासून उन्हाळी सुटया लागणार आहेत. तेव्हा सुट्यांमध्येही विद्यार्थ्यांची माहिती घेत राहा, बालविवाह होणार नाहीत यासाठी काळजी घ्या, यंत्रणांना माहिती कळवा, अशा सुचना शिक्षण विभागाने शिक्षकांना दिल्या आहेत. बालविवाहाच्या घटना उघडकीस येत असल्याने शिक्षण विभागाकडून सतर्कता ठेवण्यात येत आहे.

शाळांमध्ये परीक्षा संपल्या असून १ मे पर्यंत पहिली ते ९ वीच्या वर्गांचे निकाल जाहीर करून प्रगतिपुस्तके विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहेत. सुटया व नवीन शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रकही जाहीर करण्यात आले आहे. २ मे पासून उन्हाळी सुटया लागतील. त्यानंतर १५ जूनपासून नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात होणार आहे. सुटयांच्या काळात ८ वी नंतरच्या मुलींचे बालविवाह होत असल्याच्या घटना समोर येतात. अनेक मुलींचे उन्हाळी सुटीत बालविवाह लावले जातात. त्यामुळे ग्रामपंचायती तसेच शिक्षकांनी दक्ष राहावे. शाळा सुरू झाल्यानंतर विद्यार्थी अनुपस्थित राहिल्यास बालविवाह झाल्याचे समजते. तेव्हा अशा घटनांना आळा बसावा, या हेतूने शाळांना सुटया लागल्यावरही शिक्षकांनी विद्यार्थ्यांची माहिती ठेवावी. काही माहिती कळल्यास त्वरित संबंधित यंत्रणा व अधिकाऱ्यांना कळवावी. शिक्षण विभागाच्या वतीने गटशिक्षणाधिकारी, शिक्षक, मुख्याध्यापक, विस्तार अधिकारी व ग्रामपंचायती यांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



## मुरबाड-कल्याण रस्ता बनलाय धोकादायक

■ **मुरबाड** : गेल्या अनेक दिवसांपासून मुरबाड कल्याण राष्ट्रीय महामार्गावरील रस्त्याचे काम प्रगतीत असून ठिकठिकाणी खोदलेल्या अवस्थेत असल्याने वाहन चालकांना तारेवरची कसरत करत मार्ग शोधावा लागतो. त्यामुळे अपघातांची मालिका सुरू असल्याने या धोकादायक रस्त्यावरुन जीवघेणा प्रवास करणारे चाकरमानी आपला जीव वाचवण्यासाठी कल्याण टिटवाळ, बदलापूर या ठिकाणी स्थलांतरित होत आहेत. त्याचा येणाऱ्या निवडणुकीत मतदानावर मोठा परिणाम होणार असल्याचे वास्तव समोर येत आहे. मुरबाड शहर हे पुणे, नाशिक, अहमदनगर व मुंबई या प्रगत शहराचे मध्यवर्ती ठिकाणी असल्याने तेथे मुलांसाठी उच्च शिक्षण,तसेच रोजगाराचे साधन उपलब्ध होऊ शकते हा उद्देश डोळ्या समोर ठेवून ग्रामीण भागातील अनेक नागरिकांनी आपले गाव सोडून मुरबाड शहरात वास्तव्य केले आहे.तेथून ते मुंबई ठाणे नवीन मुंबई बदलापूर अशा विविध ठिकाणी प्रवास करत असतात.परंतु गेले अनेक वर्षे मुरबाड कल्याण नगर या महामार्गाचे काम प्रगतीत असून ते पूर्ण केव्हा होईल याचा कालावधी सांगता येत नाही.शिवाय हा रस्ता एवढा धोकादायक बनला असून खडड्यांमुळे वाहने खिळखिळी होत आहेत.



◆ हा जीवघेणा प्रवास टाळण्यासाठी तालुक्यातील अनेक नागरिकांनी टिटवाळा, कल्याण, बदलापूर सारख्या शहरात सहारा घेत आहेत. तर काही आदिवासी शेतमजूर यांना स्थानिक ठिकाणी रोजगार उपलब्ध होत नसल्याने प्रत्येक वाडी पाड्यातील आदिवासी हे देखील रोजगारासाठी स्थलांतरित झाले आहेत. तालुक्यातील असुरक्षित रस्ते, बंद पडलेल्या कंपन्या व रोजगाराचा अभाव याचा परिणाम येणाऱ्या निवडणुकीतील होणाऱ्या मतदानावर होणार असल्याने मतदानाची टक्केवारी घसरण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

# महापालिका, वाहतूक पोलीसांची मान्सूनपूर्व तयारीची लगबग सुरू

## पावसाळ्यापूर्वी अनेक समस्यांचा निपटारा करण्याची प्रशासनाची ग्वाही

■ **उल्हासनगर** : उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील वाहतुकीच्या समस्या व मान्सूनपूर्व तयारीच्या अनुषंगाने वाहतूक पोलिसांची व महानगरपालिकेची संयुक्त बैठक महानगरपालिका स्थायी समिती सभागृहात झाली. यावेळी महापालिका आयुक्त अजिज शेख, ठाणे वाहतूक पोलीस उपायुक्त डॉ. विनय राठोड, मनपा अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त विजय पवार, एमएमआरडीए अधिक्षक अभियंता कोरगांवकर, उपायुक्त किशोर गवस व सुभाष जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश भामरे व सुधाकर खोत, प्रभाग अधिकारी गणेश शिंपी, अनिल खतुरानी दत्तात्रय जाधव , मनिष हिवरे , पाणी पुरवठा कार्यकारी अभियंता परमेश्वर बुडगे, विद्युत विभाग कार्यकारी अभियंता हनुमंत खरात बांधकाम उपअभियंता ,आदी अधिकारी उपस्थित होते.



उल्हासनगर शहरातील महत्त्वाच्या प्रश्नांबाबत या बैठकीत समन्वय व संयुक्त कार्यवाही करण्याच्या बाबत निश्चित करण्यात आले. शहरातील रस्त्यावरील खड्डे पावसाळ्यापूर्वी भरणे, प्रमुख रस्त्यांचे जे कामकाज सुरू आहे ते पूर्ण करणे व रस्ता वाहतुकीस मोकळा करणे, अनधिकृत रिक्षा व अनधिकृत रिक्षा थांबे यांचे सर्वेक्षण करणे, रस्त्यावरील अतिक्रमण हटवण्याबाबत संयुक्त कार्यवाही करणे, अनधिकृत टपऱ्यांवर कार्यवाही करणे, शहरातील रस्त्यांवर अनधिकृत अवजड वाहने पार्किंग करणाऱ्यांवर कारवाई करणे, परिवहन सेवेस अडथळा करणाऱ्या वाहनांवर व व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई करणे, शहरातील रस्त्यांवर वाहतूक नियमनासाठी विहित पट्टे मारणे, सम विषम तारखेच्या अनुषंगाने पार्किंगबाबत नागरिकांमध्ये शिस्त निर्माण होण्यासाठी नियमितपणे कारवाई करणे, शहरातील व्यापारी असोसिएशन यांच्या प्रतिनिधींसोबत संयुक्त बैठक घेऊन शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी उपाययोजना करणे, बेवारस वाहनांच्यावर ट्राफिक व आरटीओ यांच्या सोबत मिळून महानगरपालिकेने संयुक्त कारवाई करणे, अशा अनेक समस्यांवर चर्चा करून कालबद्ध नियोजन व त्याची अंमलबजावणी करण्याचे निश्चित करण्यात आले.

### कालबद्ध कामकाज करण्याचे आश्वासन

■ शहरात एमएमआरडीएच्या माध्यमातून सुरू असलेल्या कामाच्या प्रगतीबाबत एमएमआरडीएचे अधिक्षक अभियंता कोरगावकर यांनी व त्यांच्या कंत्राटदारांनी विहित मुदतीत काम पूर्ण होण्यासाठी कालबद्ध कामकाज करण्याचे आश्वासित केले. पावसाळ्यापूर्वी धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करणे, मोठे व छोटे नाले सफाई करणे आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने कार्यवाही करणे, याबाबत आयुक्त शेख यांनी विभाग प्रमुखांना निर्देश दिले.

■ वाहतूक पोलीस व महानगरपालिका यांनी समन्वय ठेवून शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी सतत व नियमित जनजागृती बरोबरच शिस्त लावण्यासाठी कारवाई करण्याची सूचना डॉ. विनय राठोड यांनी दिली. वाहतुकीच्या समस्या तिथल्या तिथे सुटाव्यात यासाठी यापुढे महानगरपालिका व संबंधित विभागांची सातत्याने बैठक घेऊन उपस्थित मुद्द्यांनुसार वेळोवेळी आढावा घेऊन एकत्रित काम करण्याबाबत आवाहन केले.

# आद्य क्रांतिवीर भांगरे यांच्या स्मारकाचे काम पूर्णत्वास

### २ मे रोजी होणार अभिवादनाचा कार्यक्रम

■ **ठाणे** : भारतीय स्वांतत्र्य लढ्यातील योद्धा , आद्य क्रांतिवीर राघोजी भांगरे यांच्या ठाणे कारागृहातील स्मारकाचा प्रश्न अखेरीस मार्गी लागला आहे. आदिवासी क्रांति सेनेचे अध्यक्ष अनिल भांगले यांच्या पाठपुराव्यामुळे हे स्मारक पूर्णत्वास येत असून येत्या दोन मे रोजी या स्मारकात अभिवादनाचा कार्यक्रम पार पडणार आहे.

ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे फाशीची शिक्षा ठोठावलेल्या आदिवासी समाजातील महान क्रांतिकारक आद्य क्रांतिवीर राघोजी भांगरे यांच्या स्मारकाची दुरवस्था झाली होती. हे स्मारक सुटसुटीत जागेत स्थलांतर करण्याचे काम अनेक वर्षांपासून प्रलंबित होते. ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडणारे क्रांतिवीर राघोजी भांगरे यांना २ मे १८४८ रोजी ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे ब्रिटिशांनी फाशी दिली होती. या महान क्रांतिवीरांच्या स्मृती जागृत करण्यासाठी स्मारक उभारण्यात आले होते. परंतु अनेक वर्षांपासून या स्मारकाची दुरवस्था झाल्याने ते अडगळीत पडले होते.

या स्मारकाचे नूतनीकरण करण्यात यावे, यासाठी महाराष्ट्र आदिवासी क्रांति सेनेचे संस्थापक अध्यक्ष अनिल भांगले, आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुनिल भांगरे, आदिवासी श्रमिक संघर्ष संघटनेचे अध्यक्ष हंसराज खेवरा यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन या स्मारकाचे नूतनीकरण करावे, अशी मागणी केली होती. त्यानंतर तत्कालीन गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी स्मारक परिसराची पाहणी करून तत्कालीन कारागृह अधीक्षक हर्षद अहिरराव यांना हे स्मारक सुटसुटीत जागेत स्थलांतरीत करण्याच्या सुचना दिल्या होत्या.



## शहापूरात जि.प.मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची पाहणी

■ **किन्हवली**: जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे यांनी शहापूर तालुक्यात दौरा केला असून ग्रामपंचायत सह आरोग्य केंद्राला भेटी दिल्या.मात्र भेटी दिलेल्या ठिकाणी स्थानिक जनतेला न सांगितल्याने नागरिक नाराज झाले आहेत. शहापूर पंचायत समितीमध्ये सध्या प्रशासक असून जिल्हा परिषद अस्तित्वात नसल्याने इथेही प्रशासक आहे. त्यातच लोकसभा निवडणूक कार्यक्रम सुरू झाल्याने तालुक्यातील प्रशासकीय कारभार ठप्प आहे. नुकताच ठाणे जिल्हा परिषदेच्या सीईओ छाया देवी शिसोदे यांनी शहापुरात दौरा केला. हा दौरा अनेक दिवसानंतर करण्यात आला. यावेळी त्यांनी तालुक्यातील ग्रामपचांयत सारमाळ व बोरशेती येथे भेट देऊन राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान योजनेंतर्गत सुरु असलेल्या नवीन ग्रामपंचायत कार्यालय बांधकामाची पाहणी केली. पंचायत समिती शहापूर येथे जलजीवन मिशन अंतर्गत सुरु असलेल्या कामकाजाचा आढावा घेतला. ग्रामपंचायत गोठेघर येथे भेट देऊन ग्रामपंचायतीचे कामकाजाची पाहणी केली, त्यानंतर सापगांव नदीवर वॉटर फिडीग सेंटर येथे भेट देऊन कामकाजाविषयी आढावा घेतला.प्राथमिक आरोग्य केंद्र शेणवा येथे भेट देऊन प्राथमिक आरोग्य केंद्राची पाहणी केली. तसेच शेणवा येथे जलजीवन मिशन अंतर्गत सुरु असलेल्या पाण्याच्या टाकीच्या कामाची पाहणी केली.



## एसटीत मासे वाहतुकीला मज्जाव... महिला विक्रेत्याचा संताप

### एसटी बसचालक-वाहकाविरोधात समितीने केली तक्रार

■ **बोईसर** : राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बसमध्ये माशांनी भरलेली टोपली नेण्यास मज्जाव केल्याने याविरोधात मच्छीमार समाजात संताप व्यक्त केला जात आहे. पालघर जिल्ह्यातील एसटी बसमधून गेल्या काही दिवसांपासून मासे विक्रेत्या महिलांना माशांच्या टोपलीसह प्रवास करण्यास बसचालक आणि वाहकांकडून मनाई केली जाते, अशी तक्रार अखिल महाराष्ट्र कृती समितीकडून बोईसर बस आगाराचे व्यवस्थापक यांच्याकडे करण्यात आली आहे. जिल्ह्याच्या पश्चिम किनारपट्टी भागात मासेमारी हा प्रमुख व्यवसाय असून मासेविक्रीची जबाबदारी महिलांकडे असते. बाजारात मासे विक्रीला नेण्यासाठी महिलांकडून एसटी बसला प्राधान्य दिले जाते. महिलांना तिकिटात ५० टक्क्यांची सुविधा असल्याने मासे विक्रेत्या महिला खासगी वाहनापेक्षा एसटी बसला अधिक प्राधान्य देतात. यामुळे एसटीच्या उत्पन्नातही चांगलीच वाढ झाली आहे. मात्र काही दिवसांपासून पालघर जिल्ह्याच्या समुद्रकिनाऱ्यावरील गावांतून पालघर, बोईसर, सफाळेकडे जाणाऱ्या बसमध्ये एसटी चालक आणि वाहकांकडून मच्छीमार महिलांना गर्दीचे कारण देत माशांच्या टोपलीसह बसमध्ये मज्जाव केला जात असल्याच्या तक्रारी होत आहेत. १९ एप्रिलला दांडी-बोईसर एसटी बसमध्ये एका मासे विक्रेत्या महिलेला बसचे चालक आणि वाहकांनी बसमध्ये घेण्यास मज्जाव केल्याचा आरोप होत आहे. याविरोधात अखिल महाराष्ट्र कृती समितीचे सरचिटणीस कुंदन दवणे यांनी बोईसर बस आगाराचे व्यवस्थापक यांना निवेदन देत चालक आणि वाहकांवर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच यापुढे असा प्रकार घडल्यास आगारात आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

